**अंतिम कारणे दाखवा नोटीस**

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/ ५ | /2019
नाशिक, दिनांक :- २२/ | /2019

प्रति,

श्रीम.शितल यशवंतसिंग परदेशी,आरोग्य सेविका (म)
प्रा.आ.केंद्र.जातेगाव,उपकेंद्र.महिरावणी, ता.नाशिक
व्दारा, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,नाशिक

आपण आरोग्य सेविका (म) यापदावर प्रा.आ.केंद्र.जातेगाव,उपकेंद्र.महिराणवणी,ता.नाशिक येथील कार्यरत ठिकाणी दि. 21/01/2017 ते दि.07/03/2018 या कालावधीत 45 दिवस अनाधिकृत गैरहजर राहुन रजा नियमांचा भंग केला,तसेच आपण आपले मुख्यालयी वास्तव्य करीत नाही, तसेच ग्रामपंचायत महिरावणी येथील रुग्णांना चुकीचा सल्ला देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करता.या कारणास्तव आपणा विरुध्द खाते चौकशी सुरु करणेसाठी याकार्यालयाचे जा.क्र.आरोग्य/अस्था-5 /1778/2017 दिनांक 22/12/2017 अन्वये ज्ञापन व दोषारोप परिशिष्ट 1 ते 4 देण्यात आले होते. आपण विहीत मुदतीत ज्ञापनाचा खुलासा सादर न केल्याने आपणा विरुध्दचे दोषारोपांची सविस्तर चौकशी करण्यासाठी या कार्यालयाचे आदेश क्रंमाक आरोग्य/आस्था-5/193/2018 दिनांक. 03/03/2018 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग,नाशिक यांचे कडील पत्र क्र. क्र.विशा.4/खाचौ/सी.आर.66/2018 दिनांक 26 नोव्हेबर,2018 अन्वये चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालाआहे. दोषारोप निहाय चौकशी अधिकारी यांचे अभिप्राय खालील प्रमाणे.

| दोषारोप क्रमांक | दोषारोपाचे स्वरुप | चौकशी अधिकारी यांचा अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | कार्यरत ठिकाणी दिनांक 21/1/2017 ते दि.7/3/2018 या कालावधीत 45 दिवस अनधिकृत गैरहजर राहुन रजा नियमांचा भंग केला, | आरोप अंशत: सिध्द होतो |
| 2 | बजावण्यात आलेल्या नोटीसांना मुदतीत खुलासा सादर केलेला नाही. | आरोप अंशत: सिध्द होतो |
| 3 | कार्यरत ठिकाणी एकही दिवस मुख्यालयी राहत नाही | आरोप सिध्द होतो |
| 4 | ग्रामपंचायत महिरावणी येथील रुग्णांना चुकीचा सल्ला देऊन दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला | आरोप अंशत: सिध्द होतो |

चौकशी अहवालातील दोषारोपातील निष्कर्षात तुमचे विरुद्धचे 04 दोषारोपांपैकी सर्व दोषारोप सिद्ध होतात. यावरुन आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग केला आहे हे सिद्ध होते. चौकशी अहवालाची प्रत यासोबत जोडुन पाठविणेत येत आहे. चौकशी अहवालाशी शिस्तभंग विषयक प्राधिकरण सहमत झाले असुन खाते चौकशी प्रकरणी आपणास शास्ती होणेबाबत शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणुन माझे मत पक्के झाले आहे.

त्यास्तव आपले विरुध्द **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) 1964 भाग 3 नियम ४-- च्या (२) नुसार**
---------- दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद का करण्यात येवू नये ----------
---------- **अशी शिक्षा का करण्यात येऊ नये** याबाबतचा आपला लेखी खुलासा ही नोटिस मिळाले पासुन 15 दिवसांचे आंत पुराव्याचे दस्ताऐवजांसह इकडेस सादर करावा. तसेच आपणांस समक्ष अजुनही काही लेखी व तोंडी पुरावे सादर करावयाचे असल्यास ते वरील मुदत्तीत सादर करावेत. खुलासा मुदतीत सादर केला नाही तसेच समाधानकारक नसल्यास आपणास प्रस्तावित केलेली शिस्तभंगाची कार्यवाही मान्य आहे असे गृहीत धरुन शिक्षेचे आदेश पारित करणेस येईल याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ,नाशिक**

2/- सोबत अंतिम कारणे दाखवा नोटीसच्या तीन प्रती जोडल्या आहेत. त्यातील एक प्रत श्रीम.परदेशी,आरोग्य सेविका (म) यांना (चौकशी अहवालाचे प्रतीसह) बजाविणेत येवुन दुसऱ्या प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन सदर पोहचची प्रत इकडेस सादर करावी. तसेच तीसरी प्रत ही आपले कार्यालयात पुराव्याकामी जपून ठेवावी.

स्वाक्षरी XXX
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**